# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 21 June 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २१ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- गेल्या दशकभरात योग ही जगभरातल्या कोट्यवधी लोकांची जीवनशैली झाल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन-११ वा आंतरराष्ट्रीय योगदिवस उत्साहात साजरा
- पुण्यात वारकरी भक्तीयोग उपक्रमात मुख्यमंत्र्यांसह वारकऱ्यांचा सहभाग-मराठवाड्यात योगाभ्यास शिबीरांना नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद
- जागतिक संगीत दिनानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीनं सृजनशील आणि सांस्कृतिक रेडिओ महोत्सवाचं आयोजन

आणि

- इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दुसऱ्या दिवशी भारताच्या उपाहारपर्यंत सात बाद ४५४ धावा

****

गेल्या दशकभरात योग ही जगभरातल्या कोट्यवधी लोकांची जीवनशैली झाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस आज साजरा होत आहे. योग दिनाचा मुख्य कार्यक्रम आंध्रप्रदेशात विशाखापट्टणम् इथं पार पडला, या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना पंतप्रधानांनी सामाजिक समरसतेची भारताची भूमिका मांडतानाच, जगभरात सध्या असलेल्या तणावातून योगसाधनाच आपल्याला शांततेचा मार्ग दाखवते, असं नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

यानंतर झालेल्या योगाभ्यासात पंतप्रधानांसह केंद्रीय मंत्री के. राममोहन नायडू, आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले. सुमारे अकरा लाखाहून अधिक नागरिकांनी यावेळी एकत्रितपणे योगासनं केली. योगाभ्यास करणाऱ्या नागरिकांच्या गर्दीने विशाखापट्टण शहरातले रस्ते, मैदानं आणि समुद्रकिनारे असा सुमारे २६ किलोमीटरचा परिसर फुलून गेला होता. समुद्रातही नौदलाच्या जहाजांवर नौसैनिकांनी योगाभ्यास केला.

****

पुण्यात राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य वारकरी भक्तीयोग उपक्रम घेण्यात आला. सावित्रीबाई फुले विद्यापीठात आज सकाळी झालेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह नागरिक तसंच वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी वार्ताहरांशी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

सांस्कृतिक मंत्रालयानं महाराष्ट्रासह देशभरातल्या १०० पर्यटन स्थळांवर आणि ५० सांस्कृतिक स्थळांवर योग प्रात्यक्षिकांचं सादरीकरण केलं. मुंबईजवळ कान्हेरी लेणी, घारापुरी लेणी, बुलडाण्यातलं गायमुख मंदिर, पुण्यातला आगा खान पॅलेस आणि शिवनेरी किल्ला, तर अमरावतीत बौद्ध स्तूप इथं योग शिबीरं घेण्यात आली.

****

दरम्यान, मराठवाड्यात इतर सर्वच जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभागी होत योगाभ्यास केला.

***छत्रपती संभाजीनगर इथं ऐतिहासिक बीबी का मकबरा प्रांगणात योगाभ्यास करण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री, खासदार डॉक्टर भागवत कराड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने यात सहभागी झाले. शहरात अनेक ठिकाणच्या योग शिबिरांमध्ये नागरिकांनी उत्साहानं सहभाग घेतला. जालना इथं जिल्हा क्रीडा संकुलावर योगासनाचं प्रात्यक्षिक घेण्यात आल. योग अभ्यासक मनोज लोणकर, सुनीता मोटाळे, ज्ञानेश्वर ठोंबरे आदींनी उपस्थितांकडून प्राणायाम तसंच योगासनं करून घेतली. बीड इथं जिल्हा क्रीडा संकुलावर योग शिबीर***

*घेण्यात आलं. धकाधकीच्या जीवनात तणाव मुक्त राहण्यासाठी, तसंच शारीरिक आणि मानसिक क्षमता कायम राखण्यासाठी दररोज योगासन करण्याचा आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलं. शहरातून 'योगदिंडी आपल्या दारी' हा उपक्रमही आज राबवण्यात आला. नांदेड इथं भक्ती लॉन्सवर झालेल्या योगशिबीरात राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर आणि आमदार बालाजी कल्याणकर यांच्यासह शेकडो नागरिकांनी सहभागी होत योगाभ्यास केला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने पोलीस कवायत मैदानावरही योग शिबीर घेण्यात आलं. लातूरचा जिल्हा क्रीडा संकुलावर झालेल्या योगाभ्यास शिबिराला नागरिकांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला. जवळपास पाच हजारांहून वर नागरिक यात सहभागी झाले. आमदार विक्रम काळे यांच्यासह मान्यवरांनीही या शिबिरात सहभाग घेत योगासनं केली. परभणी इंदिरा गांधी क्रीडा संकुलावर योगशिबीर घेण्यात आलं. नागरिक मोठ्या उत्साहात या शिबीरात सहभागी झाले. वसंतराव नाईक मराठावाडा कृषी विद्यापीठातही योग साधना शिबिर घेण्यात आलं. हिंगोली इथं संत नामदेव कवायत मैदानावर योगाभ्यास करण्यात आला. आमदार तानाजी मुटकुळे यांच्या सह अनेक नागरिक यात उत्साहाने सहभागी झाले. धाराशिव इथं तुळजाभवानी क्रीडा संकुलात भव्य योगशिबीर घेण्यात आलं. पतंजली योग समितीचे राम ढेरे यांनी योग्य प्रात्यक्षिक दाखवली. तर अनुरथ नागटिळक यांनी योगासनांविषयी माहिती दिली. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी नागरिकांनी दररोज योगाभ्यास करावा असं आवाहन केल. विभागातल्या सर्व शैक्षणिक संस्था स्थानिक स्वराज्य संस्था, विविध संस्था संघटनांच्या वतीने ही आज योग शिबिरांच्या माध्यमातून अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.*

****

जागतिक संगीत दिनानिमित्त आज सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पहिला सृजनशील आणि सांस्कृतिक रेडिओ महोत्सव घेण्यात येत आहे. मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित या महोत्सवात पाच रेडिओ संवादकांनी मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली. प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या हस्ते यावेळी ‘आशा रेडिओ गौरव पुरस्कार’ तसंच ‘महाराष्ट्र भूषण आशा भोसले’ पुरस्कार प्रदान करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ संगीतज्ञ पंडित विश्वनाथ ओक यांना आशा भोसले पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

****

आषाढी एकादशी वारी करिता तीर्थक्षेत्र पंढरपूर इथं मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या एकूण १४०० दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपयांनुसार, २ कोटी ८० लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यास शासनानं मान्यता दिली आहे. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

****

शेगाव येथून निघालेल्या संत गजानन महाराज पालखीने आज बीड जिल्ह्यात परळीहून प्रस्थान केलं, दुपारच्या सुमारास पालखीचं अंबाजोगाई शहरात आगमन झालं. नागरिकांनी ठिकठिकाणी रांगोळ्या काढून तसंच पायघड्या घालून वारकऱ्यांचं स्वागत केलं, आणि पालखीचं दर्शन घेतलं. पालखी आज यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात मुक्कामी असून उद्या लोखंडी सावरगाव मार्गे पालखी पंढरपूरकडे रवाना होईल.

संत नामदेव महाराजांची पालखी आज परभणी जिल्ह्यात दाखल झाली. नर्सी इथून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेली या पालखीचं नांदगाव आणि त्रिधारा इथं स्वागत करण्यात आलं. पालखी मार्गावर ठिकठिकाणी भक्तांनी रांगोळ्या, फुलांची आरास केली होती. पालखीचा आजचा मुक्काम परभणी इथं असणार आहे, उद्या सकाळी पालखी गंगाखेडकडे मार्गस्थ होईल.

दरम्यान, परभणी जिल्ह्यात संत जनाबाईंचं जन्मस्थान असलेल्या गंगाखेड इथं विदर्भ आणि अन्य भागातून येणाऱ्या पालख्या मुक्कामी थांबतात. शहरातील सवंगडी कट्ट्यातर्फे दिंडीतील वारकऱ्यांना विविध सोयी सुविधा पुरवल्या जातात. गेल्या अठरा तारखेपासून कट्ट्यातर्फे आरोग्य सेवा शिबीर सुरु करण्यात आलं आहे.

****

क्रिकेट

भारत आणि इंग्लंड यांच्यात हेडिंग्ले इथं सुरु असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी भारतीय संघाच्या उपाहारपर्यंत ७ बाद ४५४ धावा झाल्या आहेत. कालच्या तीन बाद ३५९ धावांवरुन खेळत असतांना आज

भारतीय संघाकडून कर्णधार शुभमन गिल १४७ आणि ऋषभ पंत १३४ धावा करत बाद झाले तर रविंद्र जडेजा दोन धावांवर खेळत आहे.

****

पॅरीस डायमंड लीग भालाफेक स्पर्धेत भारताचा नीरज चोपडा अव्वल ठरला आहे. नीरजने ८८ पूर्णांक १६ मीटर अंतरावर भाला फेकून या स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं. जर्मनीचा आघाडीचा भालापेकपटू ज्युलियन वेबर ८७ पूर्णांक ८८ मीटर अंतरावर भाला फेकून दुसऱ्या क्रमांकावर राहिला.

****

हवामान

राज्यात आजही कोकण, घाटमाथ्यासह विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागात पावसाचा जोर कायम आहे. दरम्यान, मराठवाड्यातील चार जिल्ह्यांना हवामान विभागाने पुन्हा यलो अलर्ट जारी केला असून, छत्रपती संभाजीनगर जालना, लातूर आणि बीड या जिल्ह्यांत पुढील २४ तासांत हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होण्याची शक्यता पुणे वेधशाळेने व्यक्त केली आहे.

****